Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-X Oct. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

**Aayushi International Interdisciplinary Research Journal** (Refereed & Indexed Journal)
Vol - III Issue-X OCTOBER 2016 ISSN 2349-638x Impact Factor 2.147

# संत ज्ञानेश्वर : वाङ्:मयीन ग्रंथसंपदा

विनोद अनिलराव तुंगे
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे
कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय लोहारा
ता.लोहारा जि. उस्मानाबाद

**प्रास्तावीक :--**

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात आसणाऱ्या यादव घराण्याचे राज्य अस्थित्त्वात होते. त्यावेळच्या आसणाऱ्या रामदेवराय यादव हे राज्य करित हाते. याच काळात सन 1273 मध्ये विठ्ठलपंत व रुक्मीणीदेवी या दाम्पत्याच्या पोटी ज्ञानभारती संत श्री. निवृत्तीनाथमहाराज , सन 1275 मध्ये विश्ववंदनिय ज्ञानभास्कर श्री. ज्ञानेश्वर माऊली याचा जन्म झाला .

श्री आदयशंकराचार्याप्रमाणेच वयाच्या सोळाव्या वर्षापर्यत संत ज्ञानेश्वरांनी वेद, वेदांतासह अनेक धार्मीक ग्रंथाचे अध्ययन केले होते, सामाजीक बहिष्काराच्या यातना सोसल्या होत्या. जगाचे खावयाचे दात वेगळे व दाखवावयाचे दात वेगळे असतात हे त्यांनी पुर्णत: जाणले होते. जिवनाच्या खडतर व वेदनादायी कालखंडात सर्वसामान्य तथाकथीत अडाणी माणसांमध्ये त्यांना माणसांमध्ये त्यांना माणुसकीचे दर्शन झाले होते.

व त्याउलट स्वत:ला ज्ञानी समजणाऱ्या माणसाकडुन मात्र त्यांना पदोपदी अपमान सहन करावा लागला होता. पण ज्ञानेश्वर माऊलींना त्यांच्या जिवणात आलेल्या अशा अनुभवातुनच गंभीर भविष्याची म्हणजेच धर्मावर येणाऱ्या भावी संकटाची पुर्वकल्पना आली.

अनुभव हा मानसाचा मोठा गुरु असतो. माऊलींना त्यांच्या आसणा-या अनुभवाच्या साठयाचे वर्णन त्यांनी आपल्याग्रंथामध्ये मांडण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आपणास पहावयास मिळतो.

ज्ञानेश्वरांनी आपल्या असणाऱ्या सांप्रदायीक प्रसाराच्या कार्याला सातत्याने व योग्यप्रकारचा आसणारा संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आपणास पहावयास मिळतो. समाज मनावरील आसणारा भाव हा त्यांच्या ग्रंथसंपदेच्या आधारावर आपणास कळतो. आपल्या अवघ्या आसणाऱ्या 18 व्या वर्षापर्यंत त्यांनी आपल्या आसणाऱ्या रसाळ वाणीच्या जोरावर याची आसणारी मांडणी व जोडणी योग्य अशी केलेली वाटते.

**ज्ञानेश्वरी : भावार्थदिपीका :--**

मराठीच्या वाड:मयातील अक्षरवाड:मयात गणना केलेला ग्रंथ ,संत ज्ञानेश्वराचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ होय. मराठी साहित्यसृष्ठीतील ज्ञानेश्वरांनी निर्माण केलेली अपुर्व, अक्षर, अमर, अशी साहित्यसंस्कृती, ग्रंथ म्हणजेच ज्ञानेश्वरी होय. पैठणच्या ब्रम्हवृदांकडुन शुध्दीपत्र प्राप्त झालेनंतर चौघे भावंडे नेवाशाला आले. ज्ञानेश्वरांनी नेवाश्याला आल्यानंतरच ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पुर्ण केला. भगवतगितेच्या आसणाऱ्या भाष्याचा सार या ज्ञानेश्वरीत प्रकट झ-ालेला आहे. भगवतगितेवरील भाष्याचे लेखक ' सच्चितानंद बाबा' हे होते.

संत ज्ञानेश्वरांनी भगवतगितेच्या एकुण आसणारे सातशे संस्कृत श्लोकावरील नऊ हजार ओव्यांचे ज्ञानेश्वरांचे भाष्य म्हणजेच ज्ञानेश्वरी- ज्ञानदेवी - भावार्थदिपीका होय. ज्ञानेश्वरीच्या लेखकाला शके 1212 ( इ.स. 1290) असा कविनेच स्वत : नमुद केला आहे.

" शके बरोबर बारोत्तरे । ते टिका केली ज्ञानेश्वरे ॥
सच्चितानंद बाबा आदरे । लेखकु आम्हाला ॥

(ज्ञानेश्वरी अ 18-1810)

ज्ञानेश्वरीचे आसणारे लेखनाचे सर्व काम सच्चितानंद बाबायांनी केल्याचा निर्वाळा ज्ञानेश्वरांनी दिलेला आहे. संत जनाबाई ही 'लेखकु' विषयी म्हणतात.

" ज्ञानेश्वरी अभंग बोलिले ज्या शब्दां । सच्चितानंद बाबा लिहीत्यास ॥ 1 ॥
निवृत्तीचे बोल लिहिले सोपाने । मुक्ताईची वचने ज्ञानदेवे. ॥ 2 ॥

(श्रीसकलसंतगाथा ज.अ. 271)

नाथसंप्रदाय, अनुबंध,टिकाग्रंथ , लेखन प्रयोजन,ग्रंथलेखन काळ, इ. विवाद्य प्रश्नांची प्रमाणे स्वत : ज्ञानेश्वरांनी ग्रंथांर्तगत दिलेली आहेत.

**चांगदेवपासष्टी :--**

संत ज्ञानेश्वरांचे ' चांगदेव पासष्टी ' हे काव्य केवळ 65 ओव्यांचे आहे. ते एक काव्यरुप पत्र आहे. संत ज्ञानेश्वरांनी महान योगी श्री चांगदेव यांना लिहीलेल्या पत्राचे स्वरुप आहे. चांगदेव पासष्ठीत ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाचे मुलभुत सिद्धांत,सुत्ररुपात लिखविलेले आहेत त्यामुळे तो एक प्रकारचा लहानआसा काव्यग्रंथ होय. योगिराज चांगदेव संत ज्ञानेश्वरांपेक्षा वयाने जेष्ठ होते. त्यांच्या कोऱ्या पत्राला ज्ञानेश्वरांनी पाठविलेले उत्तर म्हणजेच

**चांगदेवपासष्ठी हा ग्रंथ होय.**

त्या उत्तराचे स्वरुप म्हणजे वेदांत निरुपण असुन चांगदेवाला केलेला बोध आहे.संत ज्ञानेश्वरांचा तो एकाकी सुसंवाद आहे. एका योगी पुरुषाचे दुसऱ्या योगी पुरुषास सांगितलेला 'आत्मबोधाचा अनुभव ' पत्रात आहे. योगी चांगदेवांनी 'स्वस्ती श्रीवहेशु----।' हे शब्द पत्राप्रारंभी लिहीले . पुर्ण पत्र न लिहिताच , पत्र तसेच कोरे पाठविले त्यामुळे 'चांगदेव कोरा' आसेच जनमाणसात बोलु जावू लागले. संत ज्ञानेश्वरांनी चांगदेवाच्या दोन आसणाऱ्या शब्दापुढेच लेखन केले. त्या पत्राचा प्रारंभ करताना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

" स्वस्ति श्रीवहेशु । जो लपोनि जगदभासु ।
दावी मग ग्रासु । प्रकटला करि ॥ 1 ॥
प्रगटे तवं न दिसे । लपे तंव तंव आभासे ।
प्रगट ना लपला असे । न खोमता जो ॥ 2॥
बहु जंव जंव होये । तंव तंव काहीच न होय ।
काही नहोती आहे । अवघाची जो ॥ 3 ॥

या आसणा-या ओवितच त्याचा आसणाऱ्या गुढ असा अर्थ आपणाला सातत्याने जाणवतो.

**अभंगगाथा :--**

संत ज्ञानेश्वराच्या अभंग गाथेतील अभंग संख्या वेगवेगळी आहे. हजारापर्यंत संख्या विवीध गाथातुन आढळते त्यांच्या आभंगगाथेत गुरुमहात्म्य, सगुण-निर्गुणरुप, नाममहीमा, संतमहीमा, गौळणि, विरहीनी, रुपके, प्रेमकलह,ब्रम्हज्ञान, आत्मसाक्षात्कार, योग, उपदेश, इ.विवीध विषय आहेत. आभंगगाथेच्या आसणाऱ्या अभंगात ते म्हणतात.

" रुप पहाता लोचनी I सुख झाले वो साजणि II 1 II

तो हा विठ्ठल बरवा I तो हा माधव बरवा II 2 II

संत ज्ञानेश्वर म्हणतात, त्या विठ्ठलाचे रुप पाहिल्यावर मला माझ्या जीवनात अत्यंत द्विगुणीय अशा प्रकारचे सुख मिळाले. याच आसणाऱ्या विठ्ठलनामामध्ये एक आवड व एक प्रकारची असणारी प्रेरणा निर्माण करण्याचे व त्यास सातत्याने तेवत ठेवण्याचे सामर्थ्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) ज्ञानेश्वरी
2) चांगदेवपासष्ठी
3) आभंगगाथा
4) प्राचीन वाङ:मयाचा इतिहास डॉ. ल. रा. जसिराबादकर.
5) विवेकसिंधु - मुकूंदराज